अगाऊ जाहीर झाल्याप्रमाणें येथील अभ्यंकर सेवा मंडळातर्फे महालमध्यें नरसिंग टॉकीजच्या समोर उभारण्यात आलेल्या कै. नरकेसरी अभ्यंकर यांच्या उभ्या पुतळ्याचा अनावरण–समारंभ लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्तें परवां सोमवार ता. २ रोजीं सायंकाळीं ह्मणजे कै. अभ्यंकरांच्या चतुर्थ श्राद्ध दिवशीं झाला. समारंभास सुमारें १५ ते २० हजार लोकसमुदाय जमला होता व नगर कांग्रेस क. च्या काहीं हिरवटलेल्या लोकांनीं जरी या समारंभास गालबोट लावण्याचा उपद्याप केला तरी समारंभ अत्यंत यशस्वी झाला. या प्रसंगीं डॉ. मुंजे, कु. फत्तेसिंगराव भोंसले, ॲ. बोबडे, नागपूरचे डे. कमिशनर श्री. मॅकलेनघन, नगराध्यक्ष श्री. ग. दि. ढवळे, श्री. ए. श्री. पटवर्धन, वीर हरकरे, सावनेरचे श्री. बाबूराव हरकरे, चांद्याचे कां. आमदार श्री. रामप्रसाद दुबे, आमदार अग्निभोज, आमदार उधोजी, डे. स्पीकर सौ. अनसूयाबाई काळे, डॉ. अभ्यंकर, न्या. नियोगी, श्री. समिउल्लाखान, श्रीमंत बाळासाहेब चिटणवीस, विद्वरत्न के. ल. दप्तरी, डॉ. हरदास, श्री. शंकरगीर, डॉ. बुचे, डॉ. सोनक, नगर कां. क. चे उपाध्यक्ष श्री. लक्ष्मणराव शेलेकर, ॲ. पाध्ये ॲ. देव, श्री. मामासाहेब ब्रह्मराक्षस, ॲ. वझलवार, कै. नरकेसरींच्या पत्नी श्रीमती रमाबाई अभ्यंकर, श्री. भास्करराव नियोगी, ना. गोखले शिक्षणमंत्री, श्री. खोलकुटे, दंडिगे म्यु. सभासद, श्री. रा. वा. फुले, रा. रामभाऊ श्रोती, श्री. दासुअण्णा देशमुख, रा. ब. ताराचंद, श्री. रामजी पहेलवान व गोपालसैय्या म्यु. सभासद, डॉ. टुली, रा. सा. रामसरण, श्री. चॅटर्जी, म्यु. सेक्रेटरी, श्री. शिरपूरकर सिटी इंजि. डॉ. अणे (वणी), श्री. बुडे (कारंजा) प्रभृति प्रमुख नागरिक हजर होते.

सुरुवातीस अनाथ विद्यार्थीगृहाचे श्री. कायरकर व कवि आनंदराव टेकाडे यांनीं प्रसंगासाठीं खास तयार केलेलीं गीतें ह्मणून दाखविलीं. त्यानंतर मास्टर विनायक अंभईकर व त्यांचा ऑर्केस्ट्रा यांनीं 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत ह्मटल्यावर डॉ. खरे भाषण करण्यास उभे राहिले. जमलेल्या नागरिकांचें अभ्यंकर सेवामंडळातर्फे हार्दिक स्वागत करून डॉ. खरे ह्मणाले,

४ जाने. १९३९ महाराष्ट्र

महाराजबागेंतील उपाहार

शुक्रवारीं सायंकाळीं महाराज बागेंत डॉ. राव यांना नागरिकांतर्फे थाटाचा उपाहार देण्यांत आला. या समारंभासाठीं महाराजबागेंत श्री. कात्यायन आणि श्री. लोणकर यांनीं विद्युद्दीपांचीं सुंदर रोषणाई आणि सजावट केली होती. खुद्द डॉ. राव यांच्या टेबलाची सजावट सौ. बोस (न्या. बोस यांच्या पत्नी), कु. कामा आणि सौ. रजिस्ट्रार यांनीं उत्कृष्ट रीतीनें केली होती. समारंभाच्या सुबक प्रवेशद्वाराजवळ उभे राहून श्री. फुले, रा. ब. छोटेलाल वर्मा, श्री. समीउल्लाखान, गोस्वामी महेशपुरी आणि कु. कामा हे अभ्यागतांचें स्वागत करीत होते. सी. पी. पोलिस बँडचें सुस्वर वादन चालू होतें. डॉ. राव आल्याबरोबर बलभीम बालवीरांच्या पथकानें त्यांना सलामी दिली; व कुंवर फत्तेसिंगराव भोसले यांनीं त्यांना त्यांच्या बसण्याच्या जागीं आणलें. त्यानंतर श्री. अंभईकर यांनीं 'वंदेमातरम्' गाइल्यावर श्रीराम संगीत विद्यालयाच्या विद्यार्थिनींनीं स्वागतगीत गाइलें नंतर उपाहाराला सुरवात झाली. प्रथम डॉ. राव हे लेडी चिटणवीस, लेडी दादाभाई आणि सौ. कामा यांच्या शेजारीं कोचावर बसले होते. नंतर कांहीं वेळानें उठून त्यांनीं प्रत्येक टेबलापाशीं जाऊन निरनिराळ्या लोकांशीं हस्तांदोलन केलें; व थोडथोड्या गप्पाहि मारल्या.

सर्व पक्षाच्या लोकांची उपस्थिति

या समारंभाला नागपुरातील सर्व पक्षाचे आणि सर्व जातींचे प्रमुख स्त्रीपुरुष हजर होते. लेडी पार्वतीबाई, लेडी दादाभाई, लेडी बर्टन, सौ. इंदिराबाई नियोगी सौ. काळे, सौ. बोस प्रभृति स्त्रिया, डॉ. खरे, ना. गुप्ता, श्री. कलाप्पा, श्री. रामराव आणि डॉ. पंजाबराव देशमुख, श्री. गोपाळराव ओगले, श्री. रफिक शहा, श्री. रिझवी, सरदार गुजर, श्री. गवई, खा. ब. तारापोर, श्री. कृष्णराव ठाकूर, श्रीमंत बाबुराव देशमुख, श्री. ब. बासाहेब पाध्ये वि ...

यानंतर परिषदेचें पहिल्या दिवशींचे काम संपलें. दुपारी ३ वा. विषयनियामक मंडळाची बैठक सुरू होऊन नंतर ३॥ ला व दुसर दिवशीं दुपारीं २ वा. परिषदेचें पुन्हा खुलें अधिवेशन ठराव वगैरे पास करण्यासाठीं भरविण्यांत आलें. रात्रीं ९॥ वा. श्री. अंभईकर यांचें गायनाचा व इतर करमणुकीचें कार्यक्रम होऊन परिषद समाप्त झाली. बेहोर राजेंद्रसिंग पहिल्या दिवशीचें काम आटोपून जबलपूरला निघून गेले. त्यांच्या पश्चात श्री. समीउल्लाखान यांची अध्यक्षपदावर नेमणूक करण्यांत आली.

महाराष्ट्र ता. १-३-३९

रविवार ११-३-५०

स्थानिक कार्यक्रम

श्री संत तुकाराम महाराज पुण्यतिथी महोत्सव : वाडी अमर दादर येथें लोकसत्तातर्फे श्री. ह. रा. महाजनी यांचें महाराष्ट्रीय संत मंडळींत तुकारामाचें स्थान या विषयावर व्याख्यान. त्यानंतर संगीत सुधाकर श्री. अंभईकर यांचे अभंग गायन.

—श्री तत्त्वज्ञान मंडळातर्फे श्री तुकाराम महाराज व एकलव्य महाराज यांचे पुण्यतिथीनिमित्त श्री व्यंकटेश मंदिरांत श्री. केतकर यांचें व्याख्यान सायंकाळीं ६ वा.

महात्माजींचा सातवा मासिक श्राद्धदिन

महात्माजींच्या सातव्या मासिक श्राद्धदिनानिमित्त आज सकाळीं कॉंग्रेसभवनांत प्रार्थना व सूतकताईचा कार्यक्रम पार पाडण्यांत आला.

'सूतकताई ही क्षुल्लक बाब आहे असें मानूं नका. राष्ट्राच्या आर्थिक प्रश्नाचा विचार करतांना सूतकताईचा विचार करणें जरूर पडेल.' असे उद्गार श्री. अबीद अलीनी या निमित्तानें जमलेल्या लोकांसमोर काढले. श्री. अंभईकर यांनीं यावेळीं प्रार्थना व भजनें म्हटली.

[illegible]

श्री. मुकुंदराव पाध्ये यांच्या नकला आणि श्री अंभईकर यांचें "वंदे मातारम्" हें पद निरनिराळ्या रागांत गाऊन दाखविणें हे कार्यक्रम विशेष चांगले झाले. श्री. अंभईकरांनी स्वतः बसविलेली 'वंदे-मातरम्' या पदाची 'खंबायत' रागांतलि चाल नाविन्यपूर्ण आणि राष्ट्रगीताला गांभीर्य आणि उदात्तता देण्याच्या दृष्टीनें योग्य वाटतें. या करमणुकीच्या कार्यक्रमांत स्त्रियांनीहि कोणी "फुलल्या कळ्या प्रेमाच्या" हें पद म्हणून दाखवून कोणी अभिमन्यूचा पोवाडा एखाद्या अभिजात शाहीराप्रमाणें म्हणून दाखवून तर मिसेस साठे यांनी बालगंधर्वांची स्वयंवरांतील

नागरिक

मुंबई, ता. ९ डिसेंबर १९४०

इस्माईल कॉलेज मराठी वाङ्मयमंडळ

मुंबई ता. ८ डिसेंबर

जोगेश्वरी येथील यूसफ इस्माईल कॉलेजच्या मराठी वाङ्मयमंडळाचें स्नेह-संमेलन आज सायंकाळीं झालें.

या प्रसंगानिमित्त करमणुकीचा भरगच्च कार्यक्रम आंखण्यांत आला होता. सौ. नलिनी गुप्ते यांचें नृत्य, श्री. राजा बढे यांचें काव्यगायन, संगीत सुधाकर श्री. अंभईकर यांचें गायन हे छोटेखानी कार्यक्रम झाल्यावर 'चित्रा' या एकांकी नाटकाचा प्रयोग झाला. हें नाटक कॉलेजांतील इंग्रजीचे अध्यापक प्रो. राजाध्यक्ष यांनीं खास आजच्या समारंभानिमित्त लिहीलें होतें.

...दोन्ही योजना सरका... Khan Ma... ...य नागपूर म्युनिसिपालिटीला ...च्या ...बाबदारीवर पूर्ण करतां येणार नाहींत." शेवटीं ...हल पाणी पुरवठ्याची योजना पूर्ण झाल्या... १९४० सालच्या जानेवारीच्या १ तारखे...सून शहराला पाणी मिळूं लागेल, अशी ...शा प्रदर्शित करून श्री. ढवळे यांनीं मुख्य ...ांनांना विहिरीच्या कामास प्रारंभ करण्याची ...नंति केली.

मुख्य प्रधानांचें भाषण

विहिरींच्या कामाला प्रारंभ करण्यापूर्वी ना. ...ं. खरे यांनीं छोटेंसें भाषण करून कमिटीनें ...तीं घेतलेली योजना शहराच्या उन्नतीच्या ...ष्टीनें किती महत्त्वाची आहे तें सांगितलें. ...ुख्य प्रधानांनीं सुरुवातीला आपल्या भाषणांत आजच्या या समारंभाबद्दल समाधान व्यक्त केलें; व ते पुढें म्हणाले, "मनुष्य एक वेळ अन्नाशिवाय फार दिवस जगूं शकेल पण पाण्याशिवाय मात्र त्याला जगतां येणार नाहीं. पूर्वीच्या काळीं शहरांतील पाणी-पुरवठ्याचा प्रश्न इतका महत्त्वाचा नव्हता. परंतु विद्येचा प्रसार ...वर लोकांच्या रहाणीबाबतच्या कल्पना बदलल्याबरोबर पाणी-पुरवठ्याचाहि प्रश्न जास्त निकडीचा होऊं लागला. कांहीं वर्षांपूर्वी नागपूर हें दुय्यम दर्जाचें शहर होतें. परंतु पुढें या शहराचें महत्त्व वाढूं लागून त्याबरोबर शहराची लोकसंख्याहि वाढली. १९२१ सालीं नागपूर शहराची लोकसंख्या १ लक्ष ४० हजार होती, ती १९३१ सालीं २ लक्ष २० हजार झाली. येत्या म्हणजे १९४१ च्या खानेसुमारीच्या वेळीं ही संख्या ३ लाखांवर जाईल अशी मला खात्री वाटते. तेव्हां या वाढत्या लोकसंख्येबरोबर पाणी पुरवठ्याचा प्रश्नहि जास्त तीव्र

...पळीं गरज भाग...वतील. परंतु गरिबांना तें शक्य नाहीं. तेव्हां म्युनि. च्या या खर्चांच्या योजनांना लोकांनीं विरोध कां करावा हेंच मला समजत नाहीं."

कामाला प्रारंभ

मुख्य प्रधानांनीं याप्रमाणें भाषण केल्यावर ते नदीच्या काठावर बांधलेल्या विहिरीजवळ गेले. तेथें त्यांच्या हस्तें विहिरींतील चिखल व इतर घाण यंत्राच्या सहाय्यानें काढण्याच्या कामास प्रारंभ करण्यांत आला. या प्रसंगीं टिळक विद्यालयाचा बँड वाजत होता. हा प्रारंभ समारंभ झाल्यावर मुख्य प्रधान सभास्थानीं आले. तेथें त्यांना नगराध्यक्षांनीं चिखल काढणाऱ्या लोखंडी ड्रेजरची एक रौप्य प्रतिमा नजर केली. नंतर पानसुपारी हारतुरे वाटण्यांत आल्यावर श्री. अंभईकर यांचें 'वंदेमातरम्' गीत झालें. शेवटीं तेथील मुख्य इंजिनियर श्री. छत्रे यांनीं आभार मान... त्यावर नगराध्यक्षांनीं मुख्य प्रधानांना 'थ्री चियर्स' दिले व नंतर हा गोड समारंभ सायंकाळ ६ वाजतां संपला.

करून फेरनिवडणुकीस उभे राहण्यांत त्यांनीं चूक केली आहे असें सांगितलें! त्यानंतर वंदेमातरमचा कार्यक्रम झाल्यावर अध्यक्षांनीं सभा संपल्याचें जाहीर केलें.

* * *

अभ्यंकर सेवामंडळाचा स्वातंत्र्यदिन

आगाऊ प्रसिद्ध केल्याप्रमाणें मंडळाचे विद्यमानें गुरुवार ता. २६ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां 'अभ्यंकर पुतळ्यापाशीं' राष्ट्रीय-ध्वजवंदनाचा कार्यक्रम मंडळाचे अध्यक्ष डॉ. दळवी यांचे हस्तें झाला. पुतळ्याला हार अर्पण केल्यानंतर मास्टर अंभईकर यांनीं वंदेमातरम राष्ट्रगीत खंबायती रागांत सुंदर रीतीनें म्हणुन दाखविल्यानंतर टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीं झेंडागीत म्हटलें. त्यानंतर स्वातंत्र्यदिनाची प्रतिज्ञा माजी नगराध्यक्ष श्री. ढवळे यांनीं सर्वांकडून म्हणून घेतली व नंतर त्यांचे स्वातंत्र्याच्या चळवळींत राष्ट्रीय सभेच्याकडून झालेलें कार्य यांचें महत्त्व प्रतिपादून मंडळातर्फे हा निराळा कार्यक्रम करण्यांत आला याबद्दल सविस्तर भाषण केलें. मंडळ हें कांग्रेसनिष्ठच आहे. डॉ. खरे, श्री ढवळे व इतरांना जरी कांग्रेसमधून बाहेर काढलें तरी त्यांची कांग्रेसभक्ति कोणी हिराऊन घेऊं शकत नाहीं असें सांगून सध्यां कांग्रेसची सूत्रें ज्यांचे हातांत आहेत त्यांनीं कांग्रेसच्या महान तत्वांची कशी विटंबना चालविली आहे हें दाखवून देऊन तींत शिरून त्यांतील दोष दूर करण्याचा प्रयत्न करण्याचे कामीं सर्व सुबुद्ध मंडळींनीं मंडळाला सहाय्य करावें, असें सांगितलें व शेवटीं मास्टर अंभईकर यांनीं वंदेमातरम गीत खंबायती रागांत बसविल्यास एक वर्ष पूर्ण होतें व त्याचाही आज वार्षिक समारंभ आहे व त्याच्या गोड चालीचा सर्वांनीं अवलंब करण्याविषयीं विनंति केली.

डॉ. खरे यांचें भाषण

त्यानंतर डॉ. खरे यांनीं भाषण करून [illegible] संस्थांतील सहकाऱ्यांनीं ६-७ [illegible] कट करून जी [illegible] राष्ट्रपति [illegible] आहे,

दैनिक 'प्रभा

८ फेब्रुवारी

सन १९३८ इसवी

रा. ब. बोले यांचें अभीष्टचिंतन

८२ व्या वाढदिवसानिमित्त

झुणकाभाकर सत्यनारायण

मुंबई, दि. ३०—दादर येथील सुप्रसिद्ध वयोवृद्ध समाजसेवक व पुढारी रा. ब. सीताराम केशव बोले हे नुकतेच एका गंडांतरांतून वांचले. गेलीं कित्येक वर्षें दादर येथें त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा आहे. रा. ब. बोले अजून हिंडते फिरते झाले नसल्यानें काल त्यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचें अभीष्टचिंतन करण्यासाठीं त्यांचे अनेक मित्र व चाहाते त्यांच्या घरीं गेले होते. त्यामध्यें बॅ. जमनादास मेहता, श्री. अ. ह. गद्रे, श्री. रा. तु. मसुरकर, श्री. गोलतकर, श्री. गोठोस्कर, भिडे गुरुजी, श्री. अंतुलकर, श्री. बागाबतकर, श्री. परकर, श्री. यशवंतराव बोले, श्री कांबळी, श्री. नरहरीपंत खांडके, रावसाहेब जाबकर, श्री. नबलकर वकील, इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे हे. मा. श्री. नावर वगैरें मंडळी प्रामुख्यानें दिसत होती. कित्तेभंडारी ऐक्यसंवर्धक मंडळी, हेटकरी भंडारी समाज, गोमंतक भंडारी समाज, हिंदुमहासभा वगैरे अनेक संस्थांच्यावतीनें रा. ब. बोले यांना पुष्पहार समर्पण करण्यांत आले.

श्री. धनंजय कीर यांनीं 'सावरकर अँड हिज टाईम्स' या आपल्या पुस्तकाची प्रत बाबासाहेबांना भेटीदाखल दिली.

झुणकाभाकर सत्यनारायण

रात्री ९ वा. कित्तेभंडारी सभागृहामध्यें रा. ब. बोले यांना उदंड आयुरारोग्य द्यावें अशी परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठीं श्री. अनंतराव गद्रे यांनीं झुणकाभाकर सत्यनारायण केला.

याप्रसंगीं संगीत सुधाकर श्री. अंभईकर

वंदेमातरम् गीताचा निर्णय ?

मा. कृष्णराव यांचा सत्कार

रविवार ता. ६ रोजीं सकाळीं ८। वाजता पुणें येथील लो. टिळक स्मारक मंदिरांत श्री. के. एफ्. नरिमन यांच्या अध्यक्षतेखाली संगीत कलानिधी मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांचा जाहीर सत्कार-समारंभ झाला. सदर समारंभ मा. कृष्णराव यांनी 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताला झिंझोटी रागाची जी एक नवी चाल लावली आहे त्याबद्दल 'मा. कृष्णराव सत्कारमंडळातर्फे' घडवून आणण्यांत आला होता. सुरुवातीस भारत गायन समाजांतील मुलींचें ईशस्तवनपर स्वागतपर पद्यगायन झाल्यावर सरदार गं. ना. मुजुमदार यांचें स्वागतपर भाषण झालें. आपल्या भाषणांत त्यांनी असें सांगितलें.

'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताला पूर्वीपासून काफी रागाची चाल आहे म्हणून तीच चाल पुढेंहि कायम ठेवावी असा आग्रह धरणें हे सध्याच्या मत-परिवर्तनाच्या काळात योग्य नाही असे मला वाटतें. यानंतर पुणें शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. पोपटलाल शहा यांनी आपल्या भाषणांत असें सांगितले कीं, राष्ट्रगीत आजवर ज्या काफी रागांत म्हणण्यांत येत होते त्या रागाची चाल चांगली कीं मा. कृष्णराव यांनी लावलेली झिंजोटी रागाची चाल चांगली याबद्दल मत देण्याचा मला अधिकार नाही. राष्ट्रगीताला कोणती चाल लावली असता ती राष्ट्रीय वृत्ति उत्पन्न करणारी, कानाला गोड लागणारी व सर्वांना सहज शिकता येईल अशी होईल हें ठरविण्याचा अधिकार राष्ट्रीय सभेकडून नेमण्यांत येणाऱ्या परीक्षक मंडळाचा आहे. सदर मंडळ ज्या चालीला मान्यता देईल तीच चाल मलाहि मान्य होईल.

यानंतर पुण्यांतील निरनिराळ्या संस्थांतर्फे मास्टर कृष्णराव यांचा, त्यांना हार घालून गौरव केल्यावर अध्यक्ष श्री. नरीमन यांचें भाषण झाले. त्यांनीहि आपल्या भाषणात असेंच ध्वनित केलें कीं, राष्ट्रीय सभेच्या पुढारी-मंडळापुढे, ज्यांनी ज्यांनी राष्ट्रगीताला नव्या चाली लावल्या आहेत, त्यांनी त्यांनी आपली चाल म्हणून दाखवावी. त्याचप्रमाणें जुनीच चाल असावी असा आग्रह धरणारानीहि आपली चाल म्हणून दाखवावी. त्यापैकी जी चाल परीक्षक मंडळाला पसंत पडेल, त्यांच्या कानाला गोड लागेल तीच चाल सर्व हिंदुस्थानभर सुरु व्हावी म्हणजे आज प्रांतागणिक ज्या निरनिराळ्या चाली ऐकूं येत आहेत तशा त्या ऐकूं येणार नाहीत.

यानंतर सत्कार मंडळातर्फे अध्यक्षांना हार घातल्यावर मा. कृष्णराव यांचें उत्तरादाखल भाषण झालें. ते म्हणाले, राष्ट्रगीताला नवी चाल लावण्याचा जसा एक प्रयोग केला तसाच नव्या चाली लावण्या[illegible]

ज्ञानी नव्या चाली [illegible] ज्यांनी नवी स्वरबांधणी [illegible] परीक्षक मंडळात समावेश [illegible] किंवा ज्यांना संगीत [illegible] नाही पण गाणें ऐकून [illegible] परीक्षक मंडळांत असावी. [illegible] चाल पसंत पडेल ती चाल [illegible] वरील आशयाचें भाषण [illegible] यांनी भैरवी रागांतील एक [illegible] नंतर झिंझोटी रागांत 'वंदेमातरम्' [illegible] म्हणून दाखविल्यावर [illegible] त्याच रागांत ते म्हणून [illegible] झाला. समारंभास गायन[illegible] हजर राहिले होते.

३१

हें सत्य कीं ठकबाजी ?

त्रिपुरी कांग्रेस व माझें वंदेमातरम्

(ले.–संगीतसुधाकर मा. अंभईकर)

" त्रिपुरी कांग्रेसमध्यें तुह्मी वन्देमातरम् कां म्हटलें नाहीं ! " अशी पृच्छा माझ्या शेंकडो मित्रांकडून व चहात्यांकडून होत असल्यामुळें त्याचा गैरसमज होऊं नये ह्मणून मुद्दाम [illegible] खुलासा करीत आहे.

जनरल सेक्रेटरीचें आश्वासन

त्रिपुरी कांग्रेस होण्यापूर्वीं सुमारें तीन साडे-तीन महिन्यांपासून माझा जनरल सेक्रे. शीं काँग्रेसमध्यें वन्देमातरम् ह्मणण्यासंबंधीं पत्र-व्यवहार सुरु होता. दोन तीन पत्रें लागोपाठ [illegible] तेव्हां एखादें उत्तर यावें. परंतु समाधानकारक असें एकहि उत्तर आलें नाहीं. शेवटीं मी " समक्ष येऊन भेटलेलें बरें " असें [illegible] एका सन्मान्य व्यक्तीस आलेल्या पत्रांत लिहिल्यावरून मी काँग्रेस भरण्याच्या सुमारें पंधरा दिवस आधीं जबलपूरला जाऊन आलों व सेक्रेटरीशीं बोलणें केलें. प्रदर्शन समिती व स्वागतकारिणी समिती यांनीं मिळून मला माझ्या पार्टीसह बोलाविण्याचें ठरलें. आमचें वंदेमातरम् गीत विषय नियामक कमे-टीच्या बैठकींत व खुल्या अधिवेशनांत त्यांना (जन. सेक्रेटरींना) जेव्हां वाटेल तेव्हां त्यांनीं ठेवायचें; असें ठरलें. परंतु, अवश्य ठेवायचेंच असा कांहीं त्याचा अर्थ नव्हता. ' मी हें पक्कें समजावें काय ? ' वेळेवर आमची निराशा होणार नाहीं ना ? ' आमचें येणें व्यर्थ जाणार नाहीं ना ? येवढेंही मीं विचारलें. सेक्रेटरी ह्मणाले, " जं गोष्ट मी एकदां व ' होय ' ह्मणून ह्मटली त पन्नास वेळां पुन्हा पुन्हा ' हो ' ह्मणण्यांत का अर्थ ? तुह्माला जरूर संधी देऊं."

आप घबडाते क्यौं ? आईये !

यानंतर मी नागपूरला परत आलों. काँग्रे सला जाण्यापूर्वीं दोन दिवस आधीं माझ्य एका मित्राकडून टेलीफोनवरून सेक्रेटरी " आमचें वन्देमातरम् नक्की आहे काय आम्ही निघावें काय " ह्मणून मुद्दाम विचार

रीला पोहोंचलों. जन. सेक्रेटरीला भेटलों. ते ह्मणाले, "आणखी एक बिलासपूरची पार्टी आली आहे. तेव्हां तुह्मांला संधी मिळेल कीं नाहीं शंका आहे. तरी त्या पार्टीच्या (संगीत समितीच्या) अध्यक्षांना किंवा सेक्रेटरीला भेटा. मी ह्मणालों, "संधी मिळणें न मिळणें सर्वस्वी आपल्याच हातीं असतांना त्यांना भेटण्याची काय आवश्यकता? वाटल्यास आपणच त्यांच्या नांवें एक चिठ्ठी लिहून द्या." चिठ्ठींत "श्री. अंभईकरांच्या पार्टीला एकादा मोका दिल्यास बरें होईल" असा मजकूर होता. ही चिठ्ठी घेऊन मी बिलासपूरच्या पार्टीकडे गेलों व त्या गायनमास्तरला दाखविली. तेव्हां असें समजलें कीं, तीन महिन्यांपूर्वीच त्यांच्या ह्मणजे बिलासपूरच्या संगीत पार्टीला श्री. ठाकूर छेदीलाल साहेबांनीं वंदेमातरम्‌चा ठेका देऊन ठेवला होता. मी त्या संगीत गुरुजीला ह्मटले, "तिन्ही-चारहि दिवस आपणच वंदेमातरम ह्मणणार काय?" ते ह्मणाले, "हां तीनों दिन हमही गायेंगे. आपको एकभी दिन चान्स नही मिलेगा. छेदिलालजीनें हमसे पहिलेही ठैरा लिया है" नंतर मी सेक्रेटरीला "बिलासपूरवाले मला एकही चान्स देण्यास तयार नाहींत" असें सांगितलें. तेव्हां ते ह्मणाले, "तो फिर अब छुट्टी. मैं क्या करूं?"

"जी गोष्ट मी एक वेळ 'होय' ह्मणून सांगितली तीच गोष्ट पन्नास वेळां पुन्हां पुन्हां 'हो' ह्मणण्यांत काय अर्थ" या सेक्रेटरींच्या पूर्वी बोललेल्या वाक्याची सत्यता (!) मला आतां पटली. यानंतर मी कांग्रेस चालू असतां दोन वेळा सेक्रेटरीला व बिलासपूरवाल्यांना भेटलों. पण व्यर्थ!

थापेबाजीचा अजब मासला

कांग्रेस संपल्याच्या दुसरे दिवशीं मी स्वागत मंडळांतील एका श्रेष्ठ व्यक्तीची भेट घेऊन निघालों. ती व्यक्ति ह्मणाली, "मैंने आपके वास्ते कल आदमी भेजाता, क्यों कीं आपका वंदेमातरम् हम आखरीमें रखने वाले थे, लेकीन आपका पत्ताभी नही मिला." मी ह्मटलें "प्रदर्शन कचेरींत आपला मनुष्य आला असता तर तेव्हांच पत्ता मिळाला असता; किंवा त्या वेळीं लाऊडस्पीकर मधून जरी मला बोलाविलें असतें तरी मी असेन तेथून आलों

असतों व शिवाय मी आपल्या (सेक्रेटरीच्या) आफिस जवळ दीड तास उभा होतों; व बिलासपूरवाल्यांनाहि भेटलों होतों. पण कांहीं उपयोग झाला नाहीं." नंतर हंसत ती व्यक्ति एकदम ह्या विषय बदलून ह्मणाली, "कल आपका गाना प्रदर्शनमें बहोत अच्छा हुवा, मैनें ऐसा रिपोर्ट सुना"

वास्तविक गडबडींत त्यांना माझ्या गाण्याचा रिपोर्ट ऐकण्याला व त्या करमणुकीच्या विषया-कडे लक्ष देण्याला वेळ तरी कसा मिळाला याचेंच मला आश्चर्य वाटलें. माझें गाणें प्रदर्श-नांत मुळीं झालेंच नाहीं. होणार ह्मणून नुसतें जाहीर झालें होतें. मायक्रोफोनमध्यें करंट आला नसल्यामुळें कार्यक्रम होऊं शकला नाहीं.

झाला ह्या प्रकारास सत्याचा मासला ह्मणावें कीं, ठकबाजी ह्मणावी !!

माझे दोन कार्यक्रम

त्रिपुरींत ता. ८ रोजीं सायंकाळीं प्रदर्श-नांत मौ. अबुल क. अझाद, शंकरराव देव यांच्या व्याख्यानांनंतर आमचें वन्देमातरम् गीत झालें.

ता. ९ रोजीं सकाळीं नागपूर प्रतिनिधि-निवासांत पं. रविशंकर शुक्लांच्या हस्तें झंडा-वंदन झालें, त्यावेळीं माझें वंदेमातरम् गीत झालें.

गीतांजलि

ले यांचा खुलासा

ठ माधव संगीत विद्या-
राजाभैय्या पूछ-
शंकर लक्ष्मण प्रवर्तक
राठीकरण करण्याच्या
महाराष्ट्र गीतांजलि'
पून प्रसिद्ध केलें आहे,
प्राय छापला आहे, तो
नाहीं. त्यांना जो अभि-
न दिला आहे तो त्यांनीं
सून, स्वतःस अनुकू
रफार करून हा असि-
छापला आहे. याबद्दल
पत्र मजजवळ पुराव्या-
छापून प्रसिद्ध झालेल्या
तेची संगीत शिक्षणाबद्दल
गये. सदरहू पुस्तकापासून
स झाणण्यासारखा फायदा
त कलानिधी श्री. गुरूवर्य
साहेब यांनीं संगीत शिक्षण
आंखून दिला आहे, त्याच
यार्थ्यांचा अल्पावधींत यं
गोष्ट अनुभवसिद्ध आहे.

वकरच होणार असलेल्या
वडणुकींतील ८६ जागांसाठीं
र उभे आहेत. श्री
असून, त्यापैकीं ३ कॉंग्रेस-
शॅलिस्ट पक्षाचे ५ व हरिजन
आहेत.

खंबायत रागांत राष्ट्रगीत

अंभईकर यांची कर्णमधुर चाल

नागपूरचे सुप्रसिद्ध तरुण गायक 'संगीत सुधाकर' श्री. वि. दे. अंभईकर यांनीं 'खंबायत' या रागांत नवीन बसविलेल्या 'वन्दे मातरम्' या राष्ट्रगीताच्या चालीनें नागपूरकरांना व तसेच परस्थ हजारों लोकांना वेड लाविलें आहे! श्री. अंभईकर यांनीं लाविलेली चाल आजपर्यंत सुमारें दोन लाख लोकांनीं ऐकली असून त्यांना पसंत पडली आहे. त्याबद्दली त्यांची अनेक थोरांमोठ्यांनीं, पुढाऱ्यांनीं व देशभक्तांनीं प्रशंसा केली आहे. अखिल भा. हिंदु महासभा, अ. भा. हिंदु युवक परिषद्, त्रिपुरी कॉंग्रेसचें प्रदर्शन, पं. जवाहरलाल नेहरूंच्या हस्तें कै. अभ्यंकर स्मारकाचा कोनशीला समारंभ, लो. ना. अणे यांच्या हस्तें नरकेसरी अभ्यंकर यांच्या पुतळ्याचें अनावरण, श्री. सुभाषचंद्र बोस यांचें व्याख्यान, भारत नाट्य संमेलन इ.

ndia) Films

महाराष्ट्र—बुधवार तारीख ९ माहे मार्च

आभार व वंदेमातरम्

वरील अशयाचें राष्ट्राध्यक्षांचें भाषण झाल्यावर मुख्य प्रधान ना. डॉ. खेर यांनीं नागरिकांतर्फे व कांग्रेस मंत्रिमंडळ तर्फे राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले. नंतर संगीतसुधाकर श्री. अंभईकर यांनीं आपल्या खड्या आवाजांत खंबायती रागांत 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत झाल्यावर सभा समाप्त झाली.

कहती है
हम आंसू बहायेंगे
ये बरबाद हमे
तरस गया

Lata Mangeshkar
दिल तोड के जाने वाले

ctures

वंदे मातरम्

१ अत्यंत उज्वल परंपरेचें व अखिल भारतांत सर्वमान्य झालेलें.

२ लाखों लोकांनीं प्रशंसिलेल्या व थोरथोर पुढाऱ्यांनीं मान्यता दिलेल्या मधुर खंबावती रागांत

३ संगीत सुधाकर श्री. अंभईकर यांनी नाविन्यपूर्ण रीतीनें सजविलेलें व विख्यात गवय्ये मर्हूम अल्लादिया खां यांच्या पट्टशिष्या म्हणून नांवाजलेल्या सुप्रसिद्ध गायिका बाई मोगुबाई कुर्डीकर यांनीं अत्यंत मधुर कंठानें गायिलेलें हें राष्ट्रगीत

कोलंबिया रेकॉर्डवर अवश्य ऐका



GE 3997 — वन्दे मातरम् राष्ट्रगीत — खंबावती.
फिर आयी लौट बहार — बिहाग बहार.

शास्त्रीय संगीताचे चहाते, गानप्रेमी रसिक व राष्ट्रप्रेमी देशबांधव या सर्वांनीं हा रेकॉर्ड संग्रहीं ठेवणें अवश्य आहे.

याशिवाय आपल्या आवडीच्या संगितांचे व समाज की भूल, पराये बसमें, गिरीबाला, शिकारपुरी, रिश्ता इत्यादि चालू चित्रपट संगिताचे रेकॉर्ड्स आपल्या जवळच्या ग्रामोफोन विक्रेत्याकडे जरूर ऐका.

कोलंबिया ग्रामोफोन कंपनी

पुणें- मंगळवार दिनांक ३ एप्रिल १९४५

तापी नदीच्या कांठीं हिंदुसंघटण महायज्ञ

लाखावर जनसमुदाय : १६० मुसलमान कुटुंबांची शुद्धि

हिंदुसंघटन प्रचारक संमेलन

श्रीमंत पांचलेगांवकर महाराजांच्या प्रयत्नानें दि. २२।२३।२४ ला बऱ्हाणपूर येथें हिंदुसंघटण महायज्ञ तापी नदीच्या कांठी मोठ्या उत्साहानें पार पडला. त्याचें कांहीं वर्णन मागें आलेंच आहे.

बऱ्हाणपूर हें अत्यंत जुनें मोंगल शाहीच्या वेळचें इतिहासप्रसिद्ध शहर असून तेथें मुसलमानांची वस्ती फार आहे. येथे व आजूबाजूच्या गांवोगांवीं प्रचार करून महाराजांनीं जागृती केली व हें यज्ञकार्य अत्यंत परिश्रमानें एक मिनिटाचीहि विश्रांति न घेतां पार पाडलें. यज्ञाच्या तिसऱ्या म्हणजे पूर्णाहुतीच्या दिवशीं तापी नदीच्या पैलतिरीं श्रीमंत केशवरावजी देशमुख यांच्या जैनाबाद गांवीं लाख लोकांना भोजन समारंभ जातीबंधन न ठेवता झाला. श्री. देशमुखांनीं स्वतः जातीनें सर्व व्यवस्था उत्तम ठेवली.

रात्रीं १० वाजतां तापीच्या अफाट पात्रांत विराट सभा होऊन त्याचवेळीं हिंदुसंघटण प्रचारक संमेलन झालें. अध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे हे होते. महायज्ञाला यश चिंतिणारे अनेक थोर विभूतींचे संदेश आले होते. त्यांत स्वातंत्र्यवीर बॅ. तात्याराव सावरकर डॉ.श्यामाप्रसाद मुकर्जी भाई परमानन्द जुगलकिशोर बिर्ला, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी श्री. बापूजी अणे श्री. ज. स. करंदीकर (केसरी) ल. ब. भोपटकर इ. चे प्रमुख होत.

संमेलनाचे दोन ठराव

संमेलनांत दोन ठराव संमत झाले. पहिला द. म. बाबाराव सावरकर यांच्या निधनाबद्दल शोकप्रदर्शन करणारा आणि दुसरा श्री. पांचलेगांवकर महाराजांनीं मंडला जिल्ह्यांत केलेल्या प्रचंड शुद्धिकार्याबद्दल पसंती व्यक्त करणारा आणि एक कोट वन्य जातीय लोकांना धर्मभ्रष्ट करणापासून वांचविण्याचा निश्चय करण्याबद्दलचा स्वागताध्यक्ष श्रीमंत केशवरावजी देशमूख यांच्या भाषणा नंतर अध्यक्ष बाबाराव खापर्डे यांचें भाषण झालें.

दे. भ. बाबाराव खापर्डे यांचें भाषण

ते म्हणाले, प्राचीन इतिहासांत विश्वामित्र रामदास वगैरे वेदर्षींच्या मुळेंच भारताचा भाग्योदय झाला. यवनांच्या धुमाकुळांत संतांनीच देशाचें रक्षण केलें समर्थ रामदास स्वामींनी शिवाजीची कास धरून धर्मरक्षण केलें. तेंच कार्य पाचलेगांवकर महाराज करीत आहेत असें सांगून संघटणेचें महत्व किती आहे व शुद्धिकृताची भूमिका काय असावी हें समजावून सांगितले.

श्री. पांचलेगावकर म्हणाले "प्रभु, रामचंद्र, शिवाजी राणा प्रतापसिंग संभाजी गुरू गोविंदसिंग वगैरे पुरुषांनीं ज्याप्रमाणें त्याग करून धर्म व स्वदेश रक्षण केलें त्याचे आदर्श आपण पुढे ठेवा. प्राण जाऊं देईन पण हिंदुधर्माचे धन जाऊं देणार नाहीं. वैदिक धर्म हा हिंदु लोकासाठींच केवळ नाहीं तर तो अखिल विश्वांत फैलावला जाण्याच्या योग्यतेचा आहे. परधर्मीयांच्या अत्यापासून रक्षण करण्याकरतां वीरवृत्ति धारण करा व त्यासाठीं संघटित व्हा. खिस्ती अथवा मुसलमानी प्रचारास भुलू नका." अशा आशयाचे कळकळीचें परिणामकारक भाषण झालें.

प्रचंड शुद्धि–सत्र

या महायज्ञ प्रसंगीं एकंदर १५० मुसलमान कुटुंबांची शुद्धि झाली, यांनीं प्रसाद ग्रहण केला. सौ.मनुताई खापर्डे (बाबासाहेब खापर्डे यांच्या पत्नी) यांनीं शुद्धिकृत बायकांना पुणें, नागपूर, भोपाळ व ग्वाल्हेर खांडवा, इंदोर जबलपूर वगैरे ठिकाणचे पाहुणे आले होते. तिन्ही दिवस गांवोगांवच्या लोकांच्या गर्दीनें, बैलगाड्यांच्या रांगेने सबंध बऱ्हाणपूरगांव भरून गेला होता. रोज रात्रीं शिवछत्रपतीची सामुदायीक आरती, भजन, कीर्तन, गायन इ. कार्यक्रम झाले. इंदूरच्या रावेरकरबुवांचे कीर्तन व संगीत सुधाकर श्री. अंभईकर यांचे [illegible]

गीतगायन झालें. १५० वर्षांचे योगी या प्रसंगी आले होते. योगसामर्थ्यावर मनुष्य पुष्कळ वर्षे (१०० च्या वर) जगू शकतो असें त्यांचे म्हणणें आहे. हजारों लोकांनीं त्यांचे दर्शन घेतलें. अशा रीतीनें हा हिंदुसंघटण महायज्ञ [illegible] झाला.

मुंबई गुरुवार ता. १७ एप्रिल १९४१ नवाकाळ

प्रिल सन १९४१ इसवी

संगीत सुधाकर श्री. अंभईकर



संगीत सुधाकर श्री. वि. दे. अंभईकर यांचे सोलापूर येथील साहित्य संमेलनमध्यें काव्य गायनाचे आकर्षक कार्यक्रम झाले. रविवारीं त्याचें श्री. खांडेकर यांचे ' घरीं एकच पणती मिणमिणती ' हें पद म्हणून दाखविलें. त्याचप्रमाणें सोमवारीं संमेलनाच्या शेवटीं व सायंकाळीं प्रो. फडके यांच्या व्याख्यानाच्या शेवटीं त्यांनीं म्हटलेलें 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत लोकांना फार आवडलें.

Front Page

Mahatma's "Shraddh"

Prayer and sacrificial mass spinning marked the observance of the seventh monthly 'Shraddh' of Mahatma Gandhi at Congress House, Bombay, today.

Mr. Abid Ali, addressing the spinners, said that spinning was not merely a symbolic act and ought not to be treated as of little significance in national reconstruction. It had a vital part to play in the economy of the country.

Mr. V. D Ambhaikar provided devotional music. A public meeting scheduled for this evening has been cancelled.

Evening News